Page No.

Date : / /

2018-19

Page No.
Date : / /

राष्ट्रीय सेवायोजना २०१८-१९

सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाची कमेटी खालील प्रमाणे आहे.

1. प्रा. जोलित कांबळे - कार्यक्रम अधिकारी
2. प्रा. प्रेरणा चव्हाण - सह. कार्यक्रम अधिकारी
3. प्रा. डॉ. एम. जी. धुतुरे - सदस्य
4. प्रा. के. बी. पात्रे - —॥—
5. प्रा. व्ही. पी. कांबळे —॥—
6. प्रा. एस. एस. सावंत —॥—

वरील सर्व निवडी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एम. लाडगावकर यांच्या वतीने करण्यात आल्या आहेत.

नोटीस

सन 2018-19 या शैक्षणिक वर्षातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या कार्यकारणी सदस्यांची सभा दि. 29·6·18 रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागात मिटींगचे आयोजन करण्यात आले आहे. सर्व सदस्यांनी ठिक 11·40 वा. उपस्थित रहावे.

सभे पुढील विषय

1) राष्ट्रीय सेवा योजना विभागात नविन स्वयंसेवकांची नोंदणी करणे
2) महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करणे
3) श्रमदानातून रस्ता निर्मिती करणे
4) आयत्या वेळचे विषय

प्रा. जे. ए. कांबळे - 
प्रा. डॉ. एम. जी. धुतुरे
प्रा. पात्रे के. बी.
प्रा. कांबळे व्ही. पी.
प्रा. सावंत एस. एस.
प्रा. सौ. पी. एल. चव्हाण

Page No.
Date :

# मिटींग

आज दि. 29.6.19 रोजी सकाळी 11:40 वा. या वर्षीची मिटींग पार पडली. या मिटींग मध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या विभागाच्या वतीने करण्यात येणाऱ्या विविध कामावर चर्चा करण्यात आली. शिवाजी विद्यापीठ कोल्हापुर आणि महाराष्ट्र शासन यांच्या निर्देशा प्रमाणे काम करण्यावर चर्चा झाली.

या मिटींग मध्ये समितीतील सर्व सभासद उपस्थित होते.

प्रा. जे. ए. कांबळे - Kamble    प्रा. डॉ. एस. श्री. डुबुरे - [signature]
प्रा. के. बी. पाटो - [signature]    प्रा. सौ. पी. एल. चव्हाण - [signature]
प्रा. व्ही. पी. कांबळे -    प्रा. एस. एस. सावंत -

वरील प्रमाणे कोरमपूर्ण झाल्यानंतर सभेच्या प्रत्यक्ष कामकाजास सुरुवात करण्यात आली.

1) विषय :-1. मागील वर्षा प्रमाणे या वर्षीही शिवाजी विद्यापीठ व शासन स्तरावरुन येणाऱ्या सुचना प्रमाणे काम करण्याचे ठरविण्यात आले.
ठराव :- वरील सुचनावरुन सर्वांनी त्या प्रमाणे काम करण्याचे ठरविण्यात आले. आणि तसा ठराव मंजूर करण्यात आला.

सुचक प्रा. जे. ए. कांबळे
अनुमोदक डॉ. एस. श्री. डुबुरे

वरील ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

2) विषय : 2, या वर्षी राष्ट्रीय सेवा योजने मध्ये नविन विद्यार्थी-विद्यार्थिनी स्वयंसेवकांची नोंदणी करणे, त्याच प्रमाणे विद्यापीठ नियमाने त्यांना शुल्क आकारणे हा ठराव मंजूर करण्यात आला. हा ठराव घेण्यात आला.

सुचक प्रा. सौ. पी. एल. चव्हाण
अनुमोदक प्रा. के. बी. पाटो

वरील ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

Scanned by CamScanner

Page No.
Date : / /

विषय :- महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करणे तसेच महाविद्यालयात येताना रस्ता खराब झालेला दुरुस्त करणे

ठराव :- महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करुण त्याचे संवर्धन करणे तसेच महाविद्यालयाचा खराब झालेला रस्ता नियमित श्रमदानातून करून घ्यावा लागेल.

सुचक - प्रा. कांबळे व्ही. पी

अनुमोदक प्रा. सावंत एस. एस.

वरील ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

नोटिस

वर्ष 2018-19 या शैक्षणिक वर्षातील दुसऱ्या सत्रातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यकारिणीची सभा राष्ट्रीय सेवा योजना विभागात दि. 8.12.18 शनिवार रोजी आयोजीत केली आहे. सर्व सभासदांनी 12.40 ला उपस्थित रहावे.

प्रा. जे. ए. कांबळे - [signature]   प्रा. डॉ. एम. जी. डुतुरे - [signature]
प्रा. के. बी. पाटे - [signature]   प्रा. व्ही. पी. कांबळे
प्रा. सौ. पी. एल. चव्हाण [signature]   प्रा. एस. एस. सावंत

मिटींग

आज दि. 8.12.18 रोजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागा मध्ये 12.50 ला प्रत्यक्ष मिटींग ला सुरुवात झाली.

विषय :- 1 महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण केलेल्या झाडांचे संवर्धन करणे

ठराव :- महाविद्यालय परिसरात लावलेल्या झाडांची काळजी घ्यावी लागेल त्याना संरक्षण जाळी तसेच पाण्याची व्यवस्था करावी लागेल.

सुचक :- प्रा. जे. ए. कांबळे

अनुमोदक - प्रा. के. बी. पाटे

विषय : राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबिर दत्तक गाव पोहाळे येथे घेणे

ठराव : या वर्षाचे दत्तक गाव पोहाळे येथे हे पाचवे वर्ष आहे आपल्या महाविद्यालयाने हे गाव पाच वर्षासाठी दत्तक घेतले या ठिकाणी शेवटचे विशेष शिबीर घ्यायचे आहे त्याची तारीख व नियोजनाचा ठराव घेण्यात आला.

सुचक : सौ. पी. एल. चव्हाण

अनुमोदक प्रा. व्ही. पी. कांबळे

वरील ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

Scanned by CamScanner

Page No.
Date : 18 / 12 / 2018

नोटीस

महाविद्यालयाचे विशेष श्रम संस्कार शिबीर मौजे पोहाळे येथे दि. 08/01/2019 रोजी पासून निवासी घेण्याचे ठरविण्यात आले आहे. तरी सर्व कमिटीने त्या ठिकाणी निवासी राहून शिबीर यशस्वी करावे. प्राचार्य आदेशान्वये कळविण्यात येत आहे.

प्रा. जे. ए. कांबळे - [signature] | प्रा. सौ. पी. एल. चव्हाण [signature]
प्रा. डॉ. एन. जी धुळूरे - [signature] | प्रा. के. बी. पाटो [signature]
प्रा. एस. एस. सावंत | प्रा. व्ही. पी. कांबळे

मिटींग

आज दि. 22/12/2018 रोजी ~~पासून~~ मिटींगचे आयोजन करण्यात आले होते. मिटींग 11:40 ला पार पडली. या मिटींग मध्ये या वर्षीचे राष्ट्रीय सेवा योजना विभाग विशेष श्रम संस्कार शिबीर मौजे पोहाळे येथे घेण्याचे ठरविण्यात आले.

या मिटींग ला कमिटीतील सर्व सभासद उपस्थित होते.

वरील प्रमाणे कोरमपूर्ण झाल्यानंतर सभेच्या प्रत्यक्ष कामकाजास सुरुवात करण्यात आली.

1) विषय :- मागील वर्षा प्रमाणे या वर्षीही राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष श्रम संस्कार शिबीर "पोहाळे-बोरगाव येथे घेण्याचे ठरविण्यात आले.

सुचक प्रा. जे. ए. कांबळे
अनुमोदक प्रा. सौ. पी. एल. चव्हाण

वरील ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

Scanned by CamScanner



अनंत आमुची ध्येयासक्ती ।
अनंत अन् आशा ।।

श्री दत्त शिक्षण प्रसारक मंडळ, पणुत्रे संचलित

## विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे

कला, वाणिज्य व विज्ञान

ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## राष्ट्रीय सेवा योजना

विशेष श्रम संस्कार शिबीर

सन २०१८–२०१९

**स्वच्छ भारत सुंदर भारत आणि ग्रामिण विकास**

*हम सबने ठाना है*
*भारत स्वच्छ बनाना है ।*

**• शिबीर स्थळ •**

मु. पो. पोहाळे तर्फ बोरगांव,
ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर.

**• शिबीर कालावधी •**

दिनांक : ०८/०१/२०१९ ते १४/०१/२०१९

सस्नेह निमंत्रण

**• संपर्क •**

प्रा. जेलित कांबळे (रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी)
मो. ९८९०१३०९१७

## * बौद्धिक कार्यक्रम *

वार दि. ०८/०१/२०१९ रोजी सकाळी १० वा.
शिबीरार्थीचे स्वागत व ग्रामस्थांशी चर्चा

ार दि. ०९/०१/२०१९ रोजी ठिक सायं. ५ वा.
: सौ. शितल कांबळे(प्रथम एज्यूकेश फॉडेशन, कोल्हापूर)
: रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी
माचे अध्यक्ष : श्री. सरदार विष्णू पाटील(डे.सरपंच,पोहाळे)
उपस्थिती : श्री. सुरेश पाटील(माझी सरपंच पोहाळे)
यसिंग माळवी – दै. सकाळ

र दि. १०/०१/२०१९ रोजी ठिक सायं. ५ वा.
: प्रा. आदिनाथ कांबळे(ग.गो. जाधव महा.गगनबावडा)
: अवयव दानाचे महत्व
उपस्थिती : सौ. सुवर्णा मारुती राणे(सदस्य, ग्रा.पं.)
कराळे – दै. पुण्यनगरी

वार दि. ११/०१/२०१९ रोजी ठिक ५ वाजता
: प्रा. पद्माकर तटाळे (विठ्ठलराव पाटील कॉलेज, कळे)
: राष्ट्रीय सेवा योजना आणि आजचा युवक
ाचे अध्यक्ष : श्री. दत्तात्रय जोतिराम पाटील(सदस्य,ग्रा.पं.)
पस्थिती : सौ. माधुरी विश्वास जाधव
ण तळेकर – दै. तरुण भारत

वार दि. १२/०१/२०१९ रोजी सायं. ५ वा.
प्रा. देवराव सोनकांबळे(विठ्ठलराव पाटील कॉ., कळे)
: राष्ट्र उभारणीत युवकांची भूमिका
ाचे अध्यक्ष : श्री. सखाराम दादू पाटील(सदस्य,ग्रा.पं.)
पस्थिती : सौ. सविता शिवाजी पाटील
ाजी गुरव – दै. पुढारी

वार दि. १३/०१/२०१९ रोजी रात्री ५ वा.
प्रा. विकास विधाते(श्री. आण्णासाहेब डांगे कॉलेज हातकणगले)
लेक वाचवा, लेक शिकवा
ाचे अध्यक्ष : सौ. जयश्री अशोक माळवी(सदस्य,ग्रां.पं.)
पस्थिती : सौ. रेखाताई सुरेश पाटील(सरपंच, पोहाळे)
सिंग माळवी – दै. सकाळ

र दि. १४/०१/२०१९ रोजी सकाळी १० वा.
हळदी कुंकु समारंभ
क्रमाचे अध्यक्ष : सौ. सरिता नितीन पाटील
(खजानिस, श्री दत्त शि.प्र.मंडळ, पणुत्रे)
उपस्थिती : सौ. अलकाताई विठ्ठल पाटील
(सचिव : श्री दत्त शि.प्र. मंडळ, पणुत्रे)
सौ. रेखाताई सुरेश पाटील(सरपंच, पोहाळे)
सौ. भाग्यश्री माळवी – दै. लोकमत
सर्व महिला मंडळ, पोहाळे

Scanned by CamScanner

2018-19 विशेष श्रमसंस्कार शिबिर



सरपंच सौ. रेखाताई पाटील विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन करताना.



विशेष शिबीरात गट-चर्चा करताना स्वयंसेवक-स्वयंसेविका प्राध्यापक




मौजे भोसले येथे मतदार जागृती फेरी

Scanned by CamScanner

# वार्षिक अहवाल
## २०१८-१९

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

- प्रा. जेलित कांबळे,
कार्यक्रम अधिकारी

**नियमित कार्यक्रम व विशेष शिबीर**

सन २०१८-१९ यावर्षी नियमीत कार्यक्रमाचे उद्घाटन आमच्या संस्थेचे अध्यक्ष श्री. विठ्ठल पाटील साहेब यांच्या हस्ते करण्यात आले.

नियमित कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील १०० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. वर्षभर या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विविध कार्यक्रमात सहभाग नोंदवला.

प्रथमतः या १०० विद्यार्थ्यांचे उद्बोधन घेण्यात आले. वेळोवेळी त्यांना मार्गदर्शन करुन राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व त्यांना पटवून देण्यात आले.

महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच समाजसेवा, देशसेवा केली पाहिजे यासाठी विद्यार्थ्यांना आतापासूनच तयार केले जाते.

आम्ही वर्षभर खालीलप्रमाणे नियमित कार्यक्रमाचे आयोजन केले.

२१ जूनला आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा केला. त्याचप्रमाणे २६ जूनला छत्रपती शाहू महाराज जयंती साजरी केली. ११ जुलै जागतिक लोकसंख्या दिन साजरा केला. १३ ऑगस्टला आंतरराष्ट्रीय युवा दिन यावेळी प्रा. अजीत फाळके यांचे व्याख्यान ठेवले.

१४ ऑगस्टला परिसर स्वच्छता करण्यात आली.

१५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिन साजरा केला.

५ सप्टेंबर विद्यार्थी शिक्षक दिन साजरा केला. या दिवशी सर्व विद्यार्थ्यांनी कॉलेजचे कामकाज चालविले.

१८ सप्टेंबर आंतरराष्ट्रीय साक्षरता दिना निमित्त प्रा. एम. जे जाधव यांचे व्याख्यान झाले. २४ सप्टेंबरला राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त व्याख्यान प्रा. ए. डी. कांबळे यांनी दिले.

२ ऑक्टोबर रोजी महात्मा गांधी जयंती स्वच्छ भारत अभियान व्याख्यान प्रा. एन. व्ही. पाटील यांनी दिले.

१२ ऑक्टोबर रोजी राष्ट्रीय सेवा योजना प्रा. डॉ. प्रदीप लाड व्याख्यान दिले.

१७ ऑक्टोबर आंतराष्ट्रीय दारिद्र्य निर्मूलन दिन व्याख्यान प्रा. डॉ. प्रशांत पवार यांनी व्याख्यान दिले.

२६ नोव्हेंबर संविधान दिन व्याख्यान प्रा. के. एन. राक्षसे यांनी दिले.

१८ डिसेंबर रोजी जलयुक्त शिवार विषयावर व्याख्यान प्रा. डॉ. एम. के. कांबळे यांनी दिले.

१३ जानेवारी रोजी रा. से. यो. स्वयंसेवकांची शिस्त व कर्तव्य या विषयावर प्रा. जे. ए. कांबळे यांनी व्याख्यान दिले.

१३ फेब्रुवारीला अंधश्रद्धा प्रबोधनात्मक कार्यक्रम केला. श्री. संघसेन जगनकर यांचे व्याख्यान झाले.

२८ फेब्रुवारीला कार्य आढावा बैठक घेण्यात आली.

**विशेष श्रमसंस्कार शिबीर पोहाळे**

पोहाळे तर्फ बोरगांव येथे विठ्ठलराव पाटील महाविद्यालयाचे विशेष श्रमसंस्कार शिबीर दि. ८ ते १४ जानेवारी २०१९ या कालावधीत पार पडले.

शिबीराचे उद्घाटन विभागीय कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. एम. के. कांबळे यांचे हस्ते झाले. निवासी शिबिरात विद्यार्थ्यांनी सात दिवस गावाची स्वच्छता करुन गावातील घाण काढून ट्रॅक्टरने भरुन गावाबाहेर टाकली. तसेच विद्यार्थिनींनी गावातील सर्व रस्ते झाडून स्वच्छ करुन कचरा पेटवून दिला. त्याचप्रमाणे लोकांमध्ये विविध विषयावर जाणीव जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. गावकरी आणि विद्यार्थी यास रोजगार स्वयंरोजगार या विषयावर सौ. शितल कांबळे यांनी मार्गदर्शन केले. तसेच अवयव दानाचे महत्व या विषयावर प्रा. आदिनाथ कांबळे, राष्ट्रीय एकात्मता आणि आजचा युवक या विषयावर प्रा. पदमाकर तटाळे यांनी तर राष्ट्र उभारणीत आजचा युवक या विषयावर प्रा. देवराव सोनकांबळे यांनी मार्गदर्शन केले.

या शिबिराच्या समारोपासाठी प्रा. डॉ. डी. जी. चिंघणीकर विभागीय समन्वयक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर हे होते. ते म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजना हे युवकांचे व्यक्तिमत्व घडवून एक आदर्श नागरिक निर्माण करते. तसेच समारोप प्रसंगी श्री. विठ्ठल पाटील अध्यक्ष, श्री. दत्त शिक्षण प्रसारक मंडळ, पणूत्रे तसेच श्री. बाबुराव पाटील माजी पंचायत समिती सदस्य, पन्हाळा, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एम. लाडगावकर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

पोहाळेच्या सरपंच सौ. रेखाताई सुरेश पाटील, डे पो सरपंच श्री. सरदार पाटील, ग्रामपंचायत सदस्य श्री. सखाराम पाटील, सौ. सुवर्णाताई राणे, सौ. माधुरीताई जाधव, सौ. जयश्रीताई माळवी, सौ. सविताताई पाटील, माजी सरपंच श्री. सुरेश पाटील पत्रकार श्री. जयसिंग माळवी, आदी उपस्थित होते.

कार्यक्रम अधिकारी प्रा. जेलित कांबळे, प्रा. डॉ. एम. जी. घत्तूरे, प्रा. प्रौ. प्रेरणा चव्हाण, प्रा. के. बी. [illegible], प्रा. विजय कांबळे, प्रा. सतीश सावंत, श्री. [illegible] आळवेकर, बबलू माळवी, अभिजित माळवी, [illegible] पाटील आदींनी कार्यक्रम यशस्वी केला.

प्रा. जे. ए. कांबळे
कार्यक्रम अधिकारी रा. से. यो.

Scanned by CamScanner